<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक २०४/२०२१ मधील नि. क्र. ४९ खालील आदेश</u>

(CNR No. MHAH250007382021)

१. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी सदरच्या अर्जाद्वारे त्यांचेविरुध्द पारीत झालेला एकतर्फा आदेश रद्दबातल होऊन त्यांची कैफियत स्वीकारण्यात यावी अशी विनंती केली आहे.

२. प्रतिवादी क्र.१ व २ चे अर्जातील कथन असे आहे की, सदर दाव्याचे समन्स व नोटीस या प्रतिवादींना मिळाले नव्हते. तथापी बेलीफ रिपोर्ट पाहता त्यावर प्रतिवादी क्र.२ चा अज्ञान मुलाकडे नोटीस व समन्सची प्रत दिलेली असल्याचे दिसून येते. परंतु प्रतिवादी क्र.१ व २ यांना कधीही त्याबाबत माहीती झाली नाही. प्रतिवादी क्र.४ ते ७ यांना दाव्याचे समन्स मिळाल्यानंतर प्रतिवादी क्र.१ व २ यांना दाव्याची माहीती झाली. अशा परिस्थितीत प्रतिवादींची कैफीयत रेकॉर्डवर न आल्यास त्यांचे अतोनात नुकसान होईल. सबब, प्रतिवादींविरुध्दचा एकतर्फा आदेश रद्दबातल होवुन त्यांची कैफीयत स्वीकारण्यात यावी अशी विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर वादींचे म्हणणे मागविण्यात आले. सदर अर्जावर वादी यांनी आपले म्हणणे देवून असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज खरा नसुन त्यातील कारण खरे नाही. प्रतिवादी क्र.१ व २ यांना समन्सची बजावणी दि.२०/८/२०२१ रोजीच झाली आहे. तरी देखील प्रतिवादी दाव्यात जाणुन बुजुन हजर झाले नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द एकतर्फा आदेश पारीत झाला आहे. अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास उशीर लक्षात घेवुन प्रतिवादींविरुध्द हेवी कॉस्टचा हुकुम होण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले. सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादींविरुध्द जाहीर ठराव व मनाई हुकुम व मोजणीसाठी दाखल केला आहे. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र.१ व २ करीता प्रतिवादी क्र.१ चा नातु व प्रतिवादी क्र.२ चा मुलगा आशिष राजेंद्र पिंपरकर, वय २१ वर्षे यांनी स्विकारल्याचे व समन्स व नोटीस दि.१९/८/२०२१ रोजी बजावल्याचे बेलीफ रिपोर्ट नि.९ व १० वरुन दिसते. प्रतिवादी क्र.१ व २ विरुध्द दि.९/३/२०२२ रोजी एकतर्फा आदेश पारीत झाला असुन प्रस्तुत अर्ज दि.१६/४/२०२४ रोजी दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये नैसर्गीक न्यायतत्वाच्या

दृष्टीने प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकून घेणे गरजेचे आहे. प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन न घेतल्यास प्रतिवादी यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे याउलट प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास व प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर घेतल्यास दावा गुणावगुणावर चालुन निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी यांचेविरुध्दचा एकतर्फा आदेश रद्दबातल करणे न्यायोचीत होईल. तसेच वादीने दाखल करुन झालेला पुरावा व प्रतिवादी यांनी केलेल्या विलंबाचा विचार करता वादीस खर्चाची रक्कम देऊन तो विलंब भरुन काढता येईल. सबब, पुढील प्रमाणे आदेश पारित करणे न्यायोचित होईल.

**<u>आ दे श</u>**

१. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी रक्कम रुपये रु.२,०००/– (रक्कम रुपये दोन हजार मात्र) वादींना खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी वादींना खर्च दिल्यानंतर त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

३. प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम वादींना पुढील तारखेपर्यंत द्यावी.

NILESH SHRIPAL SABNIS

Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS
Date: 2024.05.09 11:13:47 +0530

(एन. एस. सबनीस)

दिनांकः– ०८/०५/२०२४

२रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
पारनेर.